परिपत्रक नं. ९८
(जनरल विभाग)

रयत शिक्षण संस्था,सातारा
दि. ११/०७/२०१९

सर्वश्री शाखाप्रमुख ,
रयत शिक्षण संस्था,

विषय - **गीतगंधाली कार्यक्रम आयोजित करणेबाबत .**

रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने संस्थेमार्फत निरनिराळे उपक्रम तसेच प्रकल्प राबविले जात आहेत. त्यातील एक उपक्रम म्हणजे, ती.कर्मवीर अण्णा यांचे प्रगतशील विचार व त्यांनी १०० वर्षापूर्वी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील विशेषत: डोंगर द-यांमध्ये राहणा-या बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याची माहिती समाजातील सर्व घटकांपर्यंत पाहेचविणे, हा होय. त्यासाठी संस्थेमार्फत विभागवार कर्मवीर जीवन दर्शन प्रदर्शन व गीतगंधाली सारखे कार्यक्रम आयोजित करीत आहोत

संस्थेचे सेवानिवृत्त लाईफ वर्कर व ख्यातनाम गायक प्रा.संभाजी पाटील यांनी राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर कर्मवीर अण्णांचे कार्य पोहचविण्याच्या उद्देशाने त्यांच्या जीवनावर गद्य-पद्य स्वरुपात गीतगंधाली कार्यक्रम बसवलेला आहे. सदर कार्यक्रमाद्वारे ते कर्मवीर अण्णांचा जीवनपट श्रोत्यांसमोर सुरेल व रसाळ वाणीमध्ये विनामुल्य सादर करणार आहेत. हा कार्यक्रम मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा.रामशेठ ठाकूरसाहेब यांनी प्रायोजित केलेला आहे. तरी गीतगंधाली हा कार्यक्रम आपण आपल्या शाखेत आयोजित करावा. त्यासाठी आपण प्रा.संभाजी पाटील, द्वारा- यशवंतराव चव्हाण इन्स्टि. ऑफ सायन्स, सातारा या पत्त्यावर संपर्क साधावा

रयत शिक्षण संस्था सातारा

सचिव,
रयत शिक्षण संस्था,सातारा

**प्रत माहितीसाठी रवाना -**

१. मा.चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा
२. श्री.सहसचिव (उ.शि./ माध्यमिक), रयत शिक्षण संस्था, सातारा
३. श्री. ऑडिटर,रयत शिक्षण संस्था, सातारा
४. सर्वश्री विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था

Letter/ CircularA ४-९१/१०४